* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक २६/०७/१९

## *विदर्भ असोसिएशन वरिष्ठ पावर लिफ्टींग स्पर्धा २०१९*

विदर्भ असोसिएशन द्वारे आयोजित वरिष्ठ पावर लिफ्टींग स्पर्धा २०१९ दिनांक १३/०७/१९ ते १४/०७/१९ दरम्यान आयोजित करण्यात आली होती. विदर्भ असोसिएशनचे प्रशिक्षक नावेद खॉन यांचे मार्गदर्शनाखाली वाशिम जिल्हा पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी संगिता मारोती ढोले यांनी ४७ वजन गटामध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. त्यात ४७ वजन गटामध्ये ३० ते ३५ महिला यांचा सहभाग नोंदविला होता. कु संगिता हिने सुर्वण पदक पटकावुन वाशिम जिल्हयाचे नाव लौकिक केले आहे. तसेच तिची नॅशनल पॉवर लिफ्टींग स्पर्धेकरीता निवड करण्यात आली आहे.

या कामगिरी बददल मा. पोलीस अधिक्षक साहेब वाशिम श्री. वसंत परदेशी यांचे तर्फे तिचा सत्कार करण्यात आला. तसेच अप्पर पोलीस अधिक्षक श्री विजय कुमार चव्हाण, पोलीस उपअधिक्षक श्रीराम घुगे, पोलीस निरिक्षक शिवाजी ठाकरे स्थानिक गुन्हे शाखा, श्री. संजय क्षिरसागर राखीव पोलीस निरिक्षक, यांचे कडुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाने भविष्यात सुध्दा अशाच प्रकारची भरीव कामगिरी करुन वाशिम जिल्हा पोलीस दलाचे नाव उंचाविण्याकरीता प्रोत्साहन दिले आहे.

Sthakre

पोलीस निरीक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम